## दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०/२०१० मधील
## निशाणी ३० वरील आदेश
## (उज्वला सकट वि. रंजना सकट)

१. अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारचे कथन असे आहे की, अर्ज दाखल करताना जाबदार क्र. २ व ३ हे अज्ञान असल्याने त्यांचे अपाक जनक आई म्हणून जाबदार क्र. १ हीच काम पाहत असे. परंतु सध्या जाबदार क्र. २ व ३ हे सज्ञान झाले असल्याने जाबदार क्र. २ व ३ त्यांचे वय वर्षे १६ यांस काट देवून वय वर्षे २७ असे लिहिणेस तसेच अपाक जनक आई श्रीमती रंजना शरद सकट यांचे नाव अपाक जनक म्हणून कमी करणे यावे अशी दुरुस्ती अर्जदार मागत आहे.

३. जाबदाराने म्हणणे दाखल करुन सदर अर्जास विरोध दर्शविला आहे. जाबदाराचे असे कथन आहे की अर्जदार यांना जाबदार क्र. २ व ३ हे सज्ञान झाल्याची बाब माहिती होती व तशी दुरुस्ती जाबदार यांनी नियमित दिवाणी अपिलामध्ये केली होती. अर्जदाराने जाणुनबूजून विलंबाने सदर अर्ज दाखल केला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्जदार व जाबदार यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार मागत असलेली दुरुस्ती करुन | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | मिळण्यास पात्र आहे काय ? | |
| २. | काय आदेश  ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## **कारणमिमांसा**

मुद्दा क्र.१ व २ करीता –

५. अर्जदार व जाबदारतर्फे युक्तीवाद ऐकला.

६. अर्जाचे अवलोकन केले असता, अर्जात जाबदार क्र. २ व ३ यांचे वय वय १६ असे नमुद आहे. अर्जदार प्रस्तुत दुरुस्ती अर्जाद्वारे जाबदार क्र. २ व ३ यांचे अर्जातील वय २७ असे नमुद व्हावे व त्याच्या आईचे नाव कमी व्हावे अशी दुरुस्ती मागत आहे. यातील जाबदार यांनी अर्जदार मागत असलेली दुरुस्ती नियमित दिवाणी अपिलाच्याकामी पूर्वीच केलेली आहे. त्यामुळे जाबदार क्र. २ व ३ हे सज्ञान झालेले आहेत ही बाब सिध्द होते. अर्जदार मागत असलेल्या दुरुस्तीमुळे अर्जाच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. ही दुरुस्ती केवळ तांत्रिक स्वरुपाची आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. अर्जदाराने पुढील तारखेपर्यंत अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

कडेगांव
दिनांक : २८/०२/२०२३

सही/–
(ज. तु. कोरेगावकर)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव